# महावनवार्ता

**सामाजिक संस्था-संघटनांचे मुखपत्र**

सचिवालय पत्ता : युवा रूरल असोसिएशन, १२३/९, कुंभारे बिल्डींग, न्यु अमर नगर, चिखली रोड, मानेवाडा, नागपूर-४४० ०३४

| मुख्य संपादक | कार्यकारी संपादक | वृत्तसंपादक | संपादकीय मंडळ सदस्य |
|---|---|---|---|
| श्री. दत्ता पाटील | श्री देवराज बारदेसकर | गौरी शास्त्री-देशपांडे | श्री. दिलीप आखाडे |

दिनांक २५ सप्टेंबर २०१९ — अंक - २ ला


## संपादकीय....

### सहसंबंध आणि हितसंबंधांसाठी...

*'महावन वार्ता' चा पहिला अंक अगदी १५ ऑगस्ट २०१९ स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी सादर केला गेला. अनेकांच्या कडून प्रतिसाद व कौतुकही झाले. त्यामुळे संपादक मंडळाचा उत्साह नक्कीच वाढला. या अंकासाठी काही चांगल्या सूचनाही आल्या. त्यांचा जरूर विचार संपादक मंडळ करेलच. पणसूचनांसोबत सोबतच सदस्यांनी अंकात छापण्यायोग्य साहित्यही जरूर पाठवावे, अशी विनंती आहे.*

*सर्वच स्वयंसेवी विकास संस्था सारख्याच नसतील. त्यांच्या भौगोलिक, आर्थिक, मनुष्यबळ क्षमता वेगवेगळ्या असतील. तसेच वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक मुद्यांवर त्या काम करत असतील. वेगवेगळ्या कायद्याखाली त्या रजिस्टर केल्या गेल्या असतील. प्रत्येक संस्थेचे धोरणात्मक नियोजन देखील स्वतंत्र असेल. अशी विविधता असलेल्या संस्थांनी एकत्र यायचे म्हणजे सर्वांचा मिळून समान अजेंडा असायला हवा तरच किमान त्या अजेंड्या भोवती आम्ही सर्व एकत्र येऊ. विविध प्रश्नावर काम करीत असताना त्या सामाजिक-आर्थिक प्रश्नाच्या संदर्भात आम्ही एकत्र येतोच आहोत जसे कि शिक्षण अधिकार अभियान, माहिती अधिकार अभियान आदी.*

*महावन देखील अशाच काही अजेंड्यावर आधारित उभे राहिले आहे आणि तो अजेंडा सर्वांचा आहे. अजेंड्याचा पहिला भाग आहे तो या सेक्टरच्या अंतर्गत क्षमतांचा, या मध्ये संस्थेचे व्यवस्थापक मंडळ, मनुष्यबळ, सिस्टम्स, कार्यसंस्कृती, आर्थिक व्यवस्थापन अशा अनेक बाबी येतात. त्याच बरोबर या संस्था अनेक बाहेरील हितसंबंधींवरती अवलंबून असतात, जसे की, ज्या समाजासोबत काम करायचे असते तो समाज, या कार्यासाठी लागणारा आर्थिक सहयोग देणारे दाता वर्ग, शासन व्यवस्था, कायदे अंमलकरणारे अधिकारी आणि सर्वात महत्वाचे असे सहसंबंधी आणि हितसंबंधी. या क्षेत्रात टिकायचे असेल तर या दोन्ही गोष्टी अतिमहत्वाच्या आहेत. काही संस्था व्यक्तिगत स्तरावर या दोन्ही बाबी स्वतःपुरत्या करण्यास समर्थही असतील. परंतु काही बाबी, जसे कि कायद्यातील बदल, नवीन कायदे लागू करणे, सी.एस.आर. फॉरेन फंडिंग अशा बाबीसाठी सर्वांना एकत्र येवूनच वाटाघाटी करणे शक्य आहे, सुलभ आहे. शासनस्तरावर संस्थाना सन्मान मिळणे दुरापास्त असते. एखादी संस्था वैयक्तिक संबंधामुळे असा सन्मान मिळवू शकते परंतु ते सर्व सेक्टरसाठी मिळवायचे असेल तर एकत्र संघटनाशिवाय पर्याय नाही, हे समजून घ्यायला हवे.*

*या अनुषंगाने महावनचा हा दुसरा मासिक अंक आपल्यापर्यंत पोहोचवण्यास आनंद होत आहे.*

*सर्वांना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा !!*

■ **दत्ता पाटील**
राज्य निमंत्रक



## ये उदासी क्यों?

**गौरी शास्त्री-देशपांडे**
**सचिव, महावन**

सामाजिक संघटना हा शब्द नुसता उच्चारला तरी त्या पाठोपाठ या सेक्टरद्वारे समाजाला मिळालेले भरीव योगदान अधोरेखित होते. समाजाला आवश्यक अशा अनेक योजना, उपक्रम, कार्यक्रम तर या सेक्टरने राबविलेच, सोबत समाजाच्यां प्रत्येक घटकाला आत्मभान देण्याचे कार्यही केले आहे. व्यक्ती पासून तर समष्टीपर्यंत संघटनात्मकरित्या समाजाला त्याच्या हक्काकरिता जागे केले आहे. गर्भात खुडल्या जाणाऱ्या भ्रुण हत्येपासून ते इच्छा मरणाच्या अधिकारापर्यंत. मृद संधारण ते हवामान बदलापर्यंत. मानव अधिकाराच्या लढाई बरोबर मानसिक संघर्षातील आधारही समाजसेवी संघटनानी दिला. शेतकरी आत्महत्या, महिला अधिकार, बालअधिकार, महिलांवरील अत्याचार विरोधी लढाई स्थानिक ते जागतिक पातळी पर्यंत प्रबळ झाली याचे श्रेय सामाजिक सेक्टरचे आहे हे कुणी ही अमान्य करीत नाही. उलट सेक्टरने केलेले कार्य महत्वाचा दस्तावेज म्हणून इतिहासात नोंदविले आहे.

ह्या सेक्टरला मिळालेले हे कौतुक इतके सहज व सोपे नव्हते आणि नाही. हरक्षणी अपार कष्ट, संकट, संघर्ष आणि सिद्ध करण्याचे आव्हान पेलणे हे कठीण काम आहे. यात अनेक संस्था धारातीर्थी पडल्या. काहींना नामशेष करण्यात आले. तर काही चांगले व महत्वाचे काम करण्याऱ्या संघटना-संस्था केवळ आणि केवळ मार्गदर्शन व पाठिंब्या अभावी अस्तंगत झाल्या.

आजही अनेक नव्या-जुन्या संस्था अस्तित्वासाठी झगडत आहे. नव्या काळात येत असलेल्या आव्हानाना तोंड देता देता निराशेच्या छायेत जात आहे. असमंजस परिस्थीतीत झुंजत आहेत. हे संकट कुण्या एका संस्थेचे म्हणून चालणार नाही, ते संपूर्ण सेक्टरचे म्हणून त्याला लढा देण्याची गरज आहे. आणि याकरिता मार्गदर्शन देणारे कुणी बाहेरचे नव्हे तर याच सेक्टरचे तज्ञ व अनुभवी आहेत. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा, अभ्यासपूर्ण दृष्टीकोनाचा फायदा करून घेणे आवश्यक आहे. आणि हे केवळ आणि केवळ संघटनात्मकदृष्ट्याच सहजसाध्य होण्यासारखे आहे.

पूर्वी ज्याप्रमाणे कोणत्याही विपरीत सामाजिक परिस्थितीविरुद्ध जनआंदोलन उभारल्या जायचे. कार्यकर्त्यांना हाळी देत एकप्रकारे एल्गार पुकारला जायचा तो काळ पुनः एकदा आठवण्याची गरज आहे. पुन्हा एकदा त्याकाळाला आजच्या काळाशी जोडण्याची गरज आहे. होतय काय की, पोटापाण्यासाठी गाव सोडणारा माणूस गावापासून दूर जातो. आपल्या दैनंदिन संघर्षात इतका गुंतून जातो की, आपले मुळ आणि कुळच विसरून जातो. आणि अचानक त्याच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहतो. अशावेळी एकटे लढताना गरज असते ते आत्मभान देणाऱ्या सहृदयांची. जे साथ देतील, परिस्थितीतून बाहेर पडायला हात देतील. कदाचित सर्वांनाच एकमेकांची मदत होईल. प्रसंगी आधारही मिळेल.

समाजाचे हित साकारणाऱ्या स्वयंसेवी संघटना खरे तर एकट्या पडल्या आहेत. स्वतःपूरती अस्तित्वाची लढाई लढता लढता पार मेटाकुटीला आल्या आहेत. तरी देखील हाती काही फार राहील असे दिसत नाही. प्रोजेक्ट, कार्यक्रम, बजेट, टाईमलाईन, रिपोर्ट वगैरे या चक्रात अडकून समाजासाठी लढा लढण्याचा दावा करणाऱ्या संस्था स्वतःच्या सेक्टरच्या हिता साठीही लढू शकत नाहीत, एकत्र येवू शकत नाहीत, असे दुर्दैवी उद्गार आपल्याच लोकांकडून ऐकू येवू लागले आहेत. कस्तुरीमृग असल्यासारखी आपली स्थिती झाली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. तुझे आहे तुजपाशी, तरी तू जागा भुललासी हे वर्णन आपल्याला सेक्टर म्हणून तंतोतंत लागू पडू लागलेय.

परिवर्तनाचे ज्ञान, विज्ञान आणि भानही आपल्यात आहे. हे अनेकदा आपण सिद्ध करून दाखविले आहे. आता निराशलेल्या आपल्या सेक्टरलाच, अगर मुठी में जहाँ तो ये उदासी क्यो? हे खणखणीतपणे आपण साऱ्यांनी एक होवून. एका आवाजात विचारण्याची गरज निर्माण झाली आहे, हे पटतंय का?

◆◆◆

# महावनवार्ता

सामाजिक संस्था-संघटनांचे मुखपत्र










**महाराष्ट्र राज्यात नुकत्याच आलेल्या जलसंकटाबाबत आपण सारे जाणताच. खूप मोठी मनुष्यहानी,वित्तहानी आणि संसाधनहानीही या पुरामुळे झाली. या पूर परिस्थितून सावरण्याकरिता धावून जाण्यात अनेक सामाजिक संघटनांचा मोठ्ठा वाटा आहे. महावन सदस्य असलेली सिडा संस्था ह्या कार्यात अग्रेसर होती. पूरपरिस्थिती त्यास बळी पडलेल्यासाठी संस्थेने मोठ्या प्रमाणात आर्थिक व वस्तूरूप मदत एकत्रित केली. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मदतकार्य उभारले, त्याचीच ही काही छायाचित्रे....**

# परिवर्तन मेळावा संपन्न

## एच.डी.एफ.सी. बँकेच्या सहकार्याने युवा रुरल असोसीएशनचा स्तुत्य उपक्रम

युवा रुरल असोसीएशन गेल्या १६ वर्षापासून विदर्भातील सामुदायिक विकासाच्या क्षेत्रात काम करीत आहे. शाश्वत शेती, महिला सशक्तीकरण, युवा विकास, कृषी-संलग्न आणि कृषी-आधारित प्रकल्प, वन-आधारित जीवनशैली, गुणवत्ता शिक्षण, पेयजल आणि स्वच्छता यासारख्या विषयांवर जनजागरण व प्रत्यक्ष योगदान यावर युवा रुरल असोसीएशनचा विशेष भर राहिला आहे. याच शृंखलेत सर्वांगीण ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचा अंतर्गत परभणी जिल्हातील ५ गावांचा (सेलु तालुका मधील वलंगवाडी व आंबेगाव तसेच पाथरी तालुक्यातील पाटोदा, निवळी व गोपेगाव) समावेश आहे. एच.डी.एफ.सी. बँकेच्या सहकार्याने युवा रुरल असोसीएशनने ''सर्वांगीण ग्रामीण विकास'' हा प्रकल्प राबविला आहे. मागील ३ वर्षापासून राबविण्यात आलेल्या या प्रकल्पा अंतर्गत लोकांमध्ये काय आर्थिक व सामाजिक बदल झाला याबाबत बचत गटाच्या महिला कार्यकर्त्या सौ.प्रतिभा शेळके, सौ.गंगुबाई जोगदंड, सो. संगीता यांनी मनोगत व्यक्त केले.

युवा रुरल असोसीएशन वतीने परिवर्तन मिळावे शुक्रवार, १३ सप्टेंबर २०१९ रोजी गाव वलंगवाडी तालुका शेलू व दिनांक १४ सप्टेंबर २०१९ रोजी गोपेगाव, तालुका पाथरी येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून युवा रुरल असोसीएशनचे महासंचालक मा.दत्ता पाटील, मुख्य अतिथी म्हणून तर उप जिल्हा अधिकारी श्री. उमाकांत जि पारधी साहेब तर उद्घाटक म्हणून गटविकास अधिकारी,सेलु श्री. केदारे साहेब, ह.भ.प.श्री.बालाजी मोहिते, तसेच युवा रुरल असोसीएशन संस्थेचे कार्यक्रम समन्वयक श्री.बुरहानुद्दीन बोहरा, प्रशासकीय अधिकारी गौरी देशपांडे, प्रकल्प समन्वयक श्री. प्रबोधजी नायक, श्री.दिवाकर देशमुखजी, तसेच पो.पा. जोगदंड साहेब हे मान्यवर उपस्थित होते. या वेळी आंबेगाव, वलंगवाडी व पाटोदा.निवळी व गोपेगाव येथील महिला बचतगट,शेतकरी बचतगट, गावकरी, गावातील शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी श्री.श्याम





जोगदंड, परमेश्वर साखरे, संतोष जोगदंड, विठ्ठल जोगदंड, गंगाधर जोगदंड, दिनकर साखरे, शुभम शेळके व संकेत विरकर यांनी अथक परिश्रम घेतले.

# महावनवार्ता
सामाजिक संस्था-संघटनांचे मुखपत्र




# लोक संवादाची अभिरुची वाढविणारी अभिव्यक्ति...

## संस्था परिचय

माध्यमाच्या वापरातून लोक संवादाची प्रक्रिया समृध्द करणारी अभिव्यक्ति मिडिया फॉर डेव्हलपमेंट ही नोंदणीकृत सामाजिक संस्था गेल्या ३२ वर्षापासून महाराष्ट्रात माध्यम आणि संवादाच्या क्षेत्रात कार्य करीत आहे. माध्यम हे लोक शिक्षणाचा अविभाज्य घटक आहे, असा विश्वास ठेवून संस्थेने अनेक शहरी- ग्रामीण लोक समुदायाना तसेच सामाजिक संस्था संघटनांच्या कार्यकर्त्यांना माध्यमांचे कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देवून त्यांना माध्यम साक्षर आणि माध्यम चिकित्सक केलेले आहे. माध्यम चिकित्सक लोकांना समाजातील अनिष्ट रूढी परंपरेच्या विरोधात आवाज उठवण्याचे धाडस निर्माण व्हावे यासाठी महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांमध्ये माध्यम पंचायत, माध्यम संशोधन केंद्र आणि कम्युनिटी व्हिडिओ यासारख्या व्यासपीठांची निर्मिती करून लोकांच्या ज्ञान निर्मितीला स्थान मिळवून दिलेले आहे.

काळाच्या ओघात सामाजिक परिवर्तनासाठी लोक माध्यमांपेक्षा डिजिटल समाज माध्यमे ही अधिक सरस वाटू लागल्याने आम्ही महाराष्ट्रातील युवकांसाठी माध्यमदूत, माध्यम सखी तसेच युथ ॲक्शन रिसर्च, ग्राम पंचायत संगणकीय प्रणाली आणि सहशिक्षण यासारखी नाविन्यपूर्ण संकल्पना रुजवून लोकांमध्ये सामाजिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे बदल गाव विकासाच्या निर्णय प्रक्रियेत महत्वपूर्ण असून त्यातून समृध्द असे नेतृत्व पुढे येवून गाव विकासाच्या निर्णय प्रक्रियेत योगदान देत आहेत.

शाश्वत विकासाची ध्येय धोरणे लक्षात घेवून आणि आजच्या पिढीला माध्यमाच्या क्षेत्रात करियर करतांना व गावात सामाजिक विकासाच्या निर्णय प्रक्रियेत युवकांचा जबाबदार नागरिक म्हणून सहभाग वाढावा या उद्देशाने सन २०१५ पासून माध्यमदूत हा डिप्लोमा कोर्स सुरू करण्यात आला. हा कोर्स टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांच्याशी संलग्नीत आहे. गेल्या ४ वर्षात ८० युवकांनी हा कोर्स पूर्ण केला असून यातील किमान ८० युवकांना सामाजिक आणि माध्यमाच्या क्षेत्रात रोजगाराची संधी मिळालेली आहे. दिनांक २ ऑक्टोबर २०१९ पासून माध्यमदूत डिप्लोमा कोर्सची पाचवी बॅच होत आहे.

शोधिनी कृती संशोधन कार्यक्रम नाशिक जिल्ह्यातील १० ग्रामीण आदिवासी गावात सुरु केलेला आहे. सदर कृती संशोधन हे ग्रामीण भागातील शाळेत जाणाऱ्या व शाळेत न जाणाऱ्या १५ ते २५ वयोगटातील मुलींनी केला असून हे शिक्षण, आरोग्य, रोजगार या संकल्पनेवर आधारित आहे. या कृती संशोधनातून शोधिंनींनी ज्या सूचना आणि शिफारसी केलेल्या आहेत त्यातून गावात शोधिनी वाचनालय सुरू झाले आहे. तसेच त्यांनी केलेल्या शिफारसींवर राष्ट्रीय ते आंतरराष्ट्रीय स्तरावर ॲडव्होकसी करण्याचे कार्य करत आहोत. अशा प्रकारे १० गावात १० विषयावर संशोधनाची प्रक्रिया चालू आहे. तसेच याच गावात या मुलींना संशोधन करताना आव्हानांना सामोरे जावे लागले असे लक्षात आल्यानंतर प्रायोगिक तत्वावर चार गावातील शोधक म्हणजेच किशोरवयीन मुलांसोबत लिंगभाव याविषयावर कृती संशोधन करण्याचे कार्य सुरू केलेले आहे.




सहशिक्षण अभिव्यक्ती या संस्थेचा मुख्य उद्देशच विविध संस्था संघटनाच्या कार्यकर्त्यांना, व्यक्तींना आपल्या कामात नाविन्यता आणता यावी व ती समाजातील विविध घटकांपर्यन्त सुलभ करून सांगता यावी तसेच सहशिक्षण ही संकल्पना मुळातच सोबत करून शिकू, अशी असून यात एकमेकांच्या मतांचा आणि विचारांचा आदर करून ही सोबत शिकण्याची प्रक्रिया आहे.

आम्ही गेल्या ३२ वर्षाच्या कारकिर्दीत भारतातील अनेक संस्था संघटनाच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देवून त्यांचा सामाजिक राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक आणि माध्यमाविषयक दृष्टिकोन विकसित करून त्यांच्यात सामाजिक बांधीलकीची भावना विकसित केलेली आहे.

सहशिक्षणात प्रामुख्याने संवाद कौशल्य, नेतृत्व विकास, गट माध्यमे, संस्था बांधणी, दस्ताऐवजीकरण, सुजाण प्रशिक्षणाच्या वाटेवर, लैंगिक शिक्षण, सुजाण पालकत्व, प्रसार माध्यमांवर चिकित्सा, प्रशिक्षणार्थीसाठी प्रशिक्षण,विकास पत्रकारिता, शोषीतांचे नाट्य, पथनाट्य आणि डोक्युमेंटरी फिल्म मेकिंग इत्यादि विषयांवर कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

यातील काही कार्यशाळांसाठी आम्हाला संस्था संघटना आमंत्रित करतात तर काही कार्यशाळा आम्ही स्वपुढाकाराने आयोजित करत असतो.

माध्यम संसाधन केंद्राच्या माध्यमातून लोकांच्या ज्ञान निर्मितीला आणि सृजनशील अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळावे यासाठी उत्तर महाराष्ट्रातील ६० गावात कम्युनिटी लर्निंग सेंटर सुरू करण्यात आलेले आहे.

लोकांना लोकांचे प्रश्न समाजात निर्भीडपणे मांडता यावे यासाठी अभिव्यक्तीने सुरुवातीपासूनच व्हिडिओ प्रॉडक्शनची निर्मिती करून लोकांच्या निर्मितीला प्रोत्साहन दिले. व्हीडिओच्या निर्मितीतून लोकांमध्ये संवादाची प्रक्रिया अधिक प्रगल्भ होवून लोक पर्यायी विचार करण्यास प्रेरीत होतील हा विश्वास ठेवून अभिव्यक्तिने न्यूज व्हिडिओ, थिमॅटिक व्हिडिओ यांची निर्मिती केली. यावेळी अभिव्यक्तिची भूमिका ही फक्त एक फिल्म निर्माते म्हणून होती. पुढे काळांतराने लोकांना त्यांचे आस्थेचे प्रश्न मांडता यावेत यासाठी कम्युनिटी व्हिडिओ ही संकल्पना रुजवून लोकांच्या स्वभावात आणि वर्तनात बदल घडवून आणला. या प्रक्रीयेत लोकांचा सहभाग हा महत्वाचा असून त्यांच्या निर्मिती प्रक्रियेवर त्यांचेच प्रभुत्व होते, त्यामुळे त्यांच्यात कमालीचा बदल झाल्याचे जाणवले. यात आम्ही कचरावेचक महिला, बचत गट, तमाशा कलावंत, माध्यमकर्मी या समुहाना घेवून कम्युनिटी व्हिडिओ केलेत. यांनी केलेल्या फिल्मचे आपापल्या समूहात स्क्रिनिंग करून लोकांमध्ये संवादाची प्रक्रिया अधिक सक्षम करून कम्युनिटी व्हीडिओच्या प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकांचा सहभाग वाढू लागला. कम्युनिटी व्हीडीओची संकल्पना अधिक प्रभावीपणे रुजत असतानाच आम्ही कम्युनिटी व्हीडिओ या संकल्पनेवर आधारित अंकुर फिल्म फेस्टीव्हलचे आयोजन केले. हे फेस्टीव्हल नवोदित फिल्ममेकर्सचे व्यासपीठ असून यातून त्यांच्या कलागुणाना विकसित करण्याची संधी मिळत गेली. यावर्षी आम्ही ८वा राज्यस्तरीय अंकुर फिल्म फेस्टीव्हल साजरा करत आहोत.

मागील तीन वर्षापासून उत्तर महाराष्ट्रातील ४ जिल्ह्यांमध्ये १२ माध्यमसखींची निवड करून ६० गावांमध्ये काम करत आहोत. यात प्रामुख्याने पंचायतीराज, महीला सक्षमीकरण,माध्यम संवाद आणि माध्यम निर्मिती या विषयांचा आतर्भाव करण्यात आला आहे. तसेच ६० गावांमध्ये कम्युनिटी लर्निंग सेंटरची स्थापना करून फिल्म स्क्रीनिंग, युवती सुनवाई, पंचायत दर्शन अशा कार्यक्रमांचे आयोजन करून लोकांचा सामाजिक , सांस्कृतिक विकास घडविण्याचा प्रयत्न करत आहोत.

◆◆◆

## विशेष सूचना

"जसे कि महावन ची निर्मिती काही उद्देशाना समोर ठेऊन केली गेली आहे, सेक्टरच्या शाश्वती बद्दल, पोषक वातावरण व धोरणा बद्दल एकत्र येऊन योग्य पातळीवर वकिली करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने जर एखादा विषय एकंदर सेक्टरला भेडसावीत असेल तर जरूर त्या बद्दलचे लिखाण महावन वार्ता मध्ये छापण्यासाठी पाठवावे.

अशी वार्तापत्रे अनेक फोरम वरून सुरू होतात, काही दिवस चालतात व नंतर बंद होतात. बंद होण्याची करणे अनेक असतात. पण मागणी वाढली तर दुसऱ्या कोणत्याही कारणांनी ते बंद न पडता सुरू ठेवले जाते. म्हणून महावनचे सदस्य मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. अनेक जिल्ह्यात अजून बैठका झाल्या नाहीत. ज्या जिल्ह्यात जिल्हा बैठका झाल्या व तेथील जिल्हा निमंत्रक नेमून दिले आहेत त्यांनी आपल्या जिल्ह्यात सदस्य संख्या वाढवण्याचे प्रयत्न करावेत. ज्या जिल्ह्याच्या बैठका झाल्या नाहीत त्या जिल्ह्यात बैठका व्हाव्यात, असे अपेक्षित आहे. गरज वाटल्यास यासाठी राज्य सुकाणू समिती सदस्य यांची मदत घेता येईल. याकरिता स्थानिक संस्था पुढाकार घेतील अशा अपेक्षा आहेत."

**दत्ता पाटील**
राज्य निमंत्रक, महावन

## पुढील सदरासाठी साहित्य आमंत्रित आहे.

१. **कव्हरस्टोरी -** सेक्टरच्या दृष्टीने महत्वाच्या घटना उपक्रम निर्णय यावर अभ्यासपूर्ण लेख.
२. **घडामोडी -** सेक्टर मधील घडामोडी, विविध राज्यांमध्ये काय सुरु आहे. काय नवे घडतेय.
३. **संस्था परिचय -** महावन मध्ये सहभागी सदस्य संस्थाचा कार्य परिचय (प्रत्येक अंकात एक किंवा दोन संस्था )
४. **संधी-उपलब्धता-**सेक्टरला उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम बैठका मनुष्यबळ. आर्थिकसहाय इत्यादी संधी बाबत माहिती
५. **कार्यक्रम-**राज्य पातळीवर होणारे कार्यक्रम/मीटिंग याबाबत माहिती.
६. **उपक्रम/सिद्धता -** स्थानिक, राज्य पातळीवर झालेल्या कार्यक्रम/मीटिंग याचा फोटोसह वृत्तअहवाल
७. **प्रतिक्रिया/अपेक्षा/सल्ला-** सहभागी संस्था -सदस्य पदाधिकारी यांच्या महावन वार्ताबाबत प्रतिक्रिया -अपेक्षा-सल्ला
८. **माहिती असावे असे–** सोशल सेक्टरच्या संदर्भात होणारे बदल.
९. **उत्तमोत्तम–** आपल्या सदस्य संस्था संचालित करीत असलेला विशेष उपक्रम- योजना-प्रॅक्टीस
१०. **नवनवीन –** सामाजिक क्षेत्रातील समज वाढविण्यासाठी विविध विषयांवरील सदर.
११. **लय भारी–** सामाजिक क्षेत्रात-राजकीय क्षेत्रात-उद्योग जगतात- शिक्षण जगतात सामाजिक उत्थानास हातभार लावता येईल असे काही घडलेला तपशील

## सदस्यांची यादी

### महावन एप्रिल २०१९ ते मार्च २०२० चे सदस्यता शुल्क भरलेल्या सदस्य संस्थाची यादी

१ अनुभव प्रतिष्ठान ट्रस्ट
२ युवा ग्रामीण विकास मंडळ
३ इंडियन सोशल सर्व्हिस युनिट ऑफ एज्युकेशन
४ ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट
५ मनवेल बारदेसकर एज्युकेशन सोसायटी
६ विकास सहयोग प्रतिष्ठान
७ नरेंद्र कांबळे
८ सदभावना ग्रामीण विकास संस्था
९ अपेक्षा होमीओ सोसायटी
१० ग्रामीण युवा प्रगती मंडळ
११ युवा रुरल असोसीएशन
१२ विचार विकास संस्था
१३ सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट ॲक्टीव्हीटीज
१४ प्रगती अभियान
१५ प्रेरणा ग्रामविकास संस्था
१६ युवा मित्र
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान

## धर्मादाय रुग्णालयांना धर्मादाय शब्दाचे बंधन

### माहिती असावे असे...

### आयुक्तांचे आदेश पुण्यातील ५६ रुग्णालयांकडून अंमलबजावणी अपेक्षित

पुणे शहरातील रुबी, जहांगीर, पुना हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, सह्याद्री दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, आदित्य बिर्ला हॉस्पिटल अशी सर्व हॉस्पिटल्स धर्मादाय आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असल्याची मुळी कल्पनाच रुग्णांना नसल्यामुळे रुग्ण या रुग्णालयांच्या चकचकीतपणाकडे बघत घाबरतात. त्यामुळेच धर्मादाय आयुक्ता शिवकुमार डिगे यांनी पुण्यातील ५६ रुग्णालयांना त्यांच्या नावात **धर्मादाय** हा शब्द लावणे बंधनकारक केले आहे.

मुळात धर्मादाय रुग्णालये असली तरी कॉर्पोरेट बनलेल्या पंचतारांकित रुग्णालयांकडे अनेकदा गरीब रुग्ण मागे फिरतात.

उंच उंच चकचकीत रुग्णालयात धर्मादाय आहे याची कल्पना अनेक रुग्णांना नसते. त्यामुळे अनेक रुग्ण सवलतीच्या दरांतील तसेच मोफत उपचारांच्या योजनेपासून वंचित राहतात. पुढीलकाळात असे होऊ नये म्हणून आता या धर्मादाय रुग्णालयांना त्यांच्या नावापुढे धर्मादाय हा शब्द लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे पुण्यातील ५६ धर्मादाय रुग्णालयांना धर्मादाय हा शब्द त्यांच्या नावापुढे लावावा लागणार आहे.

शहरातील अनेक मोठ्या रुग्णालयांसह छोट्या अशा ५६ रुग्णालयांचा धर्मादायमध्ये समावेश आहे. त्यांच्यावर धर्मादाय कार्यालयाचे नियंत्रण आहे. म्हणूनच याबाबत नुकत्याच झालेल्या बैठकीत पुणे हॉस्पिटल असोसिएशनला डिगे यांनी आदेश दिले आहेत. या ५६ पैकी नवले रुग्णालयाने त्याची अंमलबजावणी केली असल्याची माहिती धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांनी दिली.

**राज्यातील सर्व रुग्णालयांना आदेश लागू**

धर्मादाय शब्द लावण्याबाबतचा निर्णय संपूर्ण राज्यासाठी लागू आहे. राज्यात एकूण ४३० धर्मादाय रुग्णालये असून त्यांअतर्गत दहा टक्के खाटा या १ लाख ८० हजार वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिक दुर्बलांसाठी तर आणखी दहा टक्के खाटा या निर्धन ८५ हजार वार्षिक उत्पन्न असणाऱ्या रुग्णांसाठी राखीव आहेत. आर्थिक दुर्बलरुग्णांना उपचारांमध्ये ५० टक्के सवलत तर निर्धन रुग्णांना पूर्णपणे मोफत उपचार मिळण्याची तरतूद उच्च न्यायालयाने २००३ मध्ये एका निकालाद्वारे केली आहे.

राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना त्यांच्या नावापुढे "धर्मादाय" हा शब्द लावण्याचे निर्देश बैठकीत दिले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांना ते रुग्णालय धर्मादाय आहे की नाही याची माहिती होईल. वरून कॉर्पोरेट वाटणाऱ्या धर्मादाय रुग्णालयांत गरीब रुग्णांना उपचार घेता येईल. ◆◆◆

## महावन सदस्यत्व मोहीम सुरू

**सदस्यता शुल्क**

★ ५० लाखांवर उलाढाल असणाऱ्या स्वयंसेवी संस्थाकरिता रु. ५०००/-
★ १० ते ५० लाखांपर्यंत उलाढाल असणाऱ्या स्वयंसेवी संस्थाकरिता रु. २५००/-
★ असोसीएट मेंबर्स करिता रु.५००/- ('असोसीएट मेंबर्स यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही.)

**सदस्यत्वाच्या फॉर्म बरोबर लागणारी कागदपत्रे-**

★ सदस्यत्वाचा पूर्ण भरलेला फॉर्म
★ सदस्यता फी चेक द्वारे
★ अलिकडचा ऑडिट रिपोर्ट
★ अलिकडचा वार्षिक अहवाल
★ नोंदणी प्रमाणपत्र
★ एफसीआरए प्रमाणपत्र
★ १२ ए नोंदणी प्रमाणपत्र
★ 80 जी प्रमाणपत्र
★ एनजीओ दर्पण नोंदणी क्रमांक
★ संस्थेवर कोणतीही केस नसल्याचे प्रमाणपत्र

**अकौंट डीटेल्स -**

- BANK: Kotak Bank
- ACCOUNT NAME: Yuva Rural Association Mahavan
- ACCOUNT NO: 2413636081
- IFSC : KKBK0001839
- BRANCH: Medical Square Nagpur

## महावनच्या पुढाकारातून बालसंसद प्रशिक्षण

महावनच्या पातळीवर बालकांच्या विकासाकरिता संवर्धक व समाजाच्या दृष्टीनेही पोषक अशा बालसंसद अभियानाची माहिती वेळोवेळी आपल्या पर्यंत पोहोचली आहेच. हे अभियान राबविण्याकरिता काही प्रशिक्षण मिळावे याकरिता सी.एस.ए. द्वारे व महावनच्या पुढाकारातून दि २४ ते २६ सप्टेंबर २०१९ दरम्यान युवा रुरल असोसीएशन द्वारा संचालित कुऱ्हाड येथील धरा सेंटर, कामरगाव जवळ, ता. कारंजा लाड, जि. वाशीम विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या करिता महावनद्वारे गुगल फॉर्म द्वारे प्रवेश अर्ज मागविण्यात आले. केवळ ८ दिवसाच्या अवधीत ३० अर्ज आलेत. सहभागी होवू इच्छिणाऱ्यांची संख्या यापेक्षा अधिक होती परंतु प्रवेश मर्यादेमुळे प्रवेश अर्ज घेणे बंद करावे लागले. संपूर्ण प्रशिक्षणाचे संचालन सी.एस.ए. करणार आहे. व त्याकरिता त्यांच्यापर्यंत अर्जदारांची यादी महावन द्वारे सुपूर्द करण्यात आली. या सर्व समन्वयासाठी महावन प्रती सहभागी रुपये ३०० रुपये शुल्क आकारीत आहे. ज्याची रीतसर पावती प्रशिक्षण स्थळी दिल्या जाईल. या शुल्काचा आयोजक संस्था सी.एस.ए.शी कोणताही संबंध राहणार नाही, हे महावनद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे. तसेच प्रशिक्षणार्थीच्या भोजन-निवास व प्रवासखर्चाची जबाबदारी सी.एस.ए. द्वारे घेण्यात आली आहे, याची नोंद सहभागी संस्थानी घ्यावी, ही नम्र विनंती.

महावन हे एक महाराष्ट्रातील संस्था संघटनांचे खुले व्यासपीठ आहे. अंतर्गत देवाण घेवाण, संवादाचे एक माध्यम, एकवाक्यता- संघटनांची एकी, अस्तित्व निर्माण, सरकार दरबारी व प्रशासकीयस्तरावर दखल घेतली जावी. सद्यपरीस्थितत आपल्या सेक्टरचे साधे श्रेयनिर्देशसुद्धा समाजातून होत नाही, ही शोकांतिका आहे. या मागे आपल्या सेक्टरने एकी न दाखवणे, स्वप्रतिमा निर्माण न करणे, प्रचार व प्रसिद्धीकडेही दुर्लक्ष केल्याने त्यामुळे कदाचित दखल घेतली जात नसावी. जनसंपर्क, प्रचार व प्रसिद्धी माध्यमांचा उपयोग पुरेसा व्हावा. व त्यानिमित्ताने सेक्टरचे योगदान व समाजपरिवर्तानातील महत्व सर्वासमोर यावे हा सुद्धा महावनच्या अनेक उद्देशापैकी एक महत्वाचा उद्देश आहे. तसेच प्रचार-प्रसार व संवाद या दृष्टीनेही हा अंतर्गत व बहिर्गत माध्यम म्हणून प्रयत्न आहे.

**उद्देश**

- महावनची भूमिका, विचार, कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहोविणे. सर्व स्तरातही माहिती देणे.
- सेक्टरशी संबंधीत विविध सामाजिक-आर्थिक व राजकीय विषयावर वैचारिक देवाण-घेवाण घडवून आणणे.
- स्वयंसेवी संस्थाना जबाबदेही आणि परस्पर सहकार्याची संस्कृती निर्माण करणे व त्याकरिता मार्गदर्शन करणे- करविणे व अभ्यासास चालना देणे.
- संस्था परिचय उपक्रम यांची प्रसिद्धी करणे.
- एकमेकांच्या कार्याचा परिचय करून घेणे, कार्य समजून घेणे आणि प्रोत्साहन देणे.
- विकास प्रक्रियेचे भागीदार म्हणून शासन व कार्पोरेट बरोबर समसमान भागीदारीचे वातावरण निर्माण करणे

**मुखपत्र कसे असेल?**

- मासिक तत्वावर चालणारे डीजीटल माहितीपत्रक असेल.
- याची भाषा मराठी असेल.
- ४ पानांचे रंगीत बांधणीत विविध सदरे असतील.
- प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्यां आठवड्यानंतर महावन सदस्यांना महावन गुगलग्रुप द्वारे पाठविण्यात येईल. (साधारण २५ तारखेपर्यंत .)
- यात सर्व सदस्याकडून साहित्य माहिती लेख बातम्या सहभाग अपेक्षित आहे.
- लेख-प्रसिद्धी व नियोजनाबाबत संपादकीय निर्णय अखेरचा असेल परंतु सर्व सहभागी संस्था आपल्या सूचना पाठवू शकतात त्याची योग्य दखल घेण्यात येईल.

**नमस्कार साथी,**

महावनवार्ताचा दुसरा डीजीटल अंक प्रकाशित करताना आम्हास विशेष आनंद होत आहे. पुढे नमूद केलेले सदर अंकात वेळोवेळी उपलब्ध साहित्यानुसार प्रकाशित केले जाईल. याकरिता सर्व स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते यांनी मजकूर पाठवावा. ऑक्टोंबर २०१९ च्या अंकासाठी ५ ऑक्टोंबर पर्यंत साहित्य स्वीकारले जाईल.

साहित्य mahavanmaharashtra@gmail.com या इमेल वर पाठवावे.